लिखित नोंद झाल्यानंतर पोलीस अधिकाऱ्याने तो जबाब साक्षीदाराला वाचून दाखवला पाहिजे आणि त्यावर साक्षीदाराने तो योग्य आणि अचूक असल्याचा दुजोरा दिला पाहिजे. नोंदविलेला जबाब साक्षीदारानं दिलेल्या जबाबातून वेगळा असेल त्याबाबत पोलीस अधिकाऱ्याला सांगितले गेले पाहिजे. मग त्या पोलीस अधिकाऱ्याने जबाबात आवश्यक ते बदल करत पुन्हा तो साक्षीदाराला वाचून दाखवला पाहिजे.

- साक्षीदाराच्या जबाबावर त्याची/तिची सही घेतली जाऊ शकत नाही. कलम १६२, सीआरपीसी
- साक्षीदाराला धमकावणे, साक्षीदाराच्या विधानासोबत छेडछाड करणे किंवा जबाबादरम्यान त्याच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करणे हे अमान्य आहे. कलम १६२, सीआरपीसी
- योग्य त्या नियमांनुसार, साक्षीदाराला त्याच्या/तिच्या राहत्या ठिकाणाशिवाय इतर कुठे बोलावले असेल तर पोलीस त्या साक्षीदाराला झालेला खर्च देऊ शकतात. कलम १६० (२) सीआरपीसी

## या गोष्टी तुम्ही लक्षात ठेवल्या पाहिजेत

- तुम्ही जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये चौकशीसाठी जाल तेव्हा सोबत एखादा मित्र वा नातेवाईक असू द्या.
- पोलिसांनी विचारलेल्या प्रश्नांची शांतपणे आणि सुटसुटीत-सोप्या पद्धतीने उत्तरे द्या.
- घटनेतील खऱ्या गोष्टी ज्याक्रमाने घडल्या त्या क्रमाने सांगा.
- गोष्टी रंगवून सांगू नका.
- कधीही अस्पष्ट किंवा मोघम विधाने करू नका.

**चौकशीबाबत किंवा झालेल्या प्रश्नोत्तरांबाबत तुमची काही तक्रार असेल तर तुम्ही खालील गोष्टी करू शकता :**

- तुमची तक्रार पोलीस अधीक्षक (एसपी)कडे रजिस्टर पोस्टाने पाठवा. एसपीला तुमची तक्रार योग्य वाटली तर तो/ती वैयक्तिक पातळीवर तुमच्या प्रकरणात तपास करेल किंवा तपास व्हावा, असे आदेश देईल.
- थेट स्वतःच जाऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार करा. यात पोलीस अधीक्षक किंवा अगदी पोलिस उपमहानिरीक्षक किंवा पोलीस महानिरीक्षक अशा अधिकाऱ्यांचा समावेश होतो.
- योग्य त्या अधिकारक्षेत्रातील न्यायालयाच्या दंडाधिकाऱ्यांकडे तक्रार द्या.
- तुमच्या राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्यालयात तक्रार द्या. तुमच्या राज्यात हे कार्यालय नसल्यास तुम्ही राष्ट्रीय आयोगाकडे तक्रार करू शकता.
- तुमच्या पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे तक्रार करा. अर्थात, तुमच्या राज्यात हे प्राधिकरण असेल तर.जनतेने केलेल्या पोलिसांच्या तक्रारींकडे लक्ष देण्यासाठी या विशेष संस्था असतात.
- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ मध्ये सांगितल्याप्रमाणे थेट हायकोर्टात रिट याचिका दाखल करा किंवा कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करा. तुमच्या प्रकरणात मूलभूत हक्कांचा भंग झाल्याचे न्यायालयाने मान्य केले तर न्यायालय संबंधित प्राधिकरणाला तक्रार नोंदवण्याचा आदेश देईल किंवा न्यायालयाला योग्य वाटेल त्यानुसार इतर आदेश दिला जाईल. तुम्ही अगदी एखाद्या पत्रातही तुमच्या तक्रारी लिहून त्या सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाला त्या पाठवू शकता. तुमच्या तक्रारीकडे लक्ष देण्याची गरज आहे असे न्यायालयाला वाटले, तर न्यायालय तुमच्या पत्रालाच याचिका मानून दाखल करून घेते.

## सीएचआरआयविषयी...

कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स इनिशिएटिव्ह ही एक आंतरराष्ट्रीय, स्वतंत्र, स्वयंसेवी, ना-नफा संस्था आहे. **सीपीआरआय**चे मुख्यालय भारतामध्ये आहे. प्रजासत्ताक देशांमध्ये मानवी हक्कांची जोपासना आणि जाणीव जागृती करणे हे या संस्थेचे काम आहे. मानवी हक्कांचे सतत आदर्श पद्धतीने पालन व्हावे यासाठी ही संस्था सतत प्रयत्न करते.

### आमचे उपक्रम


- ॲक्सेस टू जस्टिस (पोलीस दलाबाबतच्या सुधारणा)
- ॲक्सेस टू जस्टिस (तुरुंग यंत्रणेबाबतच्या सुधारणा)
- ॲक्सेस टू इन्फर्मेशन
- इंटरनॅशनल ॲडव्होकसी ॲन्ड प्रोग्रामिंग

**कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह**

सीपीआरआय CHRI मुख्यालय
तिसरा मजला, सिद्धार्थ चेंबर्स,
५५ ए, कालू सराय,
नवी दिल्ली- १०० ०१७ भारत,
दूरध्वनी : +९१-११-४३१८०२००
फॅक्स : +९१-११-४३१८-०२१७
ई-मेल : info@humanrightsinitiative.org
Website http:// www.humanrightsinitiative.org

# पोलीस चौकशी आणि प्रश्नोत्तर

## पोलीस आणि तुम्ही
### तुमचे अधिकार जाणा



CHRI
Commonwealth Human Rights Initiative

## पोलीस चौकशी आणि प्रश्नोत्तरे

नोंदवल्या गेलेल्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी करणे हे पोलिसांचे मूलभूत कर्तव्य आहे. चौकशी आणि प्रश्नोत्तरे हा पोलीस तपासाचा अविभाज्य भाग आहे. कथित गुन्ह्यांबाबत प्रश्न विचारून पोलीस महत्त्वाची माहिती गोळा करतात. पोलिसांनी चौकशीसाठी बोलावल्यानंतर तपासात मदत व्हावी यासाठी सत्य अचूक माहिती सांगणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. सोबतच जो पोलिसांच्या चौकशी किंवा प्रश्नांना सामोरा जातो आहे त्या व्यक्तीला कायदेशीर अधिकार असतात, त्यांचे कायम समर्थन केले गेले पाहिजे.

तुम्ही आरोपी म्हणून किंवा साक्षीदार म्हणून पोलिसांच्या चौकशी किंवा प्रश्नांना सामोरे जात असाल तर तुम्हाला काय कायदेशीर अधिकार असतात हे माहीत असायला पाहिजे. या पत्रकात त्याबाबत माहिती दिली गेली आहे. आरोपी म्हणजे एखाद्या गुन्ह्याचे आरोप ज्याच्यावर आहेत आणि ज्याला अटक होऊ शकते किंवा स्थानबद्ध केले जाऊ शकते अशी व्यक्ती. ही व्यक्ती जामिनावर बाहेर असू शकते आणि तिला चौकशीसाठी गरजेनुसार हजर राहण्याचे आदेश दिले जाऊ शकतात. कायद्यांतर्गत काही विशिष्ट प्रकरणांमध्ये तुम्हाला अटक झालेली नसू शकते किंवा स्थानबद्धतेचे आदेशही नसू शकतात. मात्र तुम्ही असे संशयित असता ज्याला पोलीस नियमितपणे चौकशीसाठी हजर राहायला सांगतात आणि कधीही तुम्हाला अटक केली जाऊ शकते. कलम ४१ आणि ४१ अ, फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) एखाद्या प्रकरणातील साक्षीदार म्हणजे आरोपी नसतो आणि त्याला वेगळ्या पद्धतीने वागवले गेले पाहिजे. तपास होत असलेल्या प्रकरणातील महत्त्वाची माहिती संबंधित साक्षीदाराकडे असेल तर पोलीस त्याची/तिची चौकशी करू शकतात.

**तुम्ही आरोपी असाल किंवा साक्षीदार, तुमची चौकशी होत असताना तुम्हाला कायदेशीर अधिकार असतात. आणि पोलिसांनी त्यांचे रक्षण केले पाहिजे. तुम्हाला या अधिकारांची आणि पोलिसांनी पाळण्याच्या अचूक प्रक्रियांची माहिती असणे गरजेचे आहे.**

### तपासादरम्यान आरोपी व्यक्तीला खालील अधिकार असतात

- पोलीस तुम्हाला एखादे विधान करण्याची बळजबरी करू शकत नाहीत किंवा तुम्ही ज्या गुन्ह्यासाठी आरोपी आहात, त्यात तुमच्याकडेच बोट दाखवणाऱ्या एखाद्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पोलीस दबाव टाकू शकत नाहीत. हा तुमचा संविधानिक अधिकार आहे. तुम्हाला या अधिकाराबाबत सांगणे, हे पोलिसांचं कर्तव्य आहे. कलम २० (३) भारतीय संविधान

- पोलीस गुन्ह्याची कबुली देण्यासाठी तुम्हाला प्रवृत्त करू शकत नाहीत किंवा तुमच्यावर दबाव टाकू शकत नाहीत. कलम २४, भारतीय पुरावा अधिनियम आणि सीआरपीसी कलम १६३

- चौकशीवेळी वकिलाचा सल्ला घेण्याचा अधिकार तुम्हाला आहे. चौकशी होत असताना वकील तुमच्या सोबत असू शकतो, पण पूर्ण चौकशीदरम्यान तो अखंडपणे तुमच्यासोबत राहू शकत नाही. या अधिकाराबाबत पोलिसांनी तुम्हाला सांगितले पाहिजे. कलम ४१ ड, सीआरपीसी

- पोलिसांच्या चौकशीदरम्यान तुम्ही केलेल्या कुठल्याही विधानावर कागदोपत्री सही करू नका. हा कायदा आहे! तुम्हाला सही करण्याची जबरदस्ती केली जाऊ शकत नाही. पोलीस म्हणत असतील तरीही कोऱ्या कागदावर कधीच सही करू नका. कलम १६२, सीआरपीसी

- तुम्ही पोलिसांकडे दिलेली कोणतीही कबुली तुमच्याविरुद्ध वापरली जाऊ शकत नाही. जोवर न्यायिक दंडाधिकाऱ्यांपुढे हे विधान केले जात नाही तोवर त्याचा पुरावा म्हणूनही वापर केला जाऊ शकत नाही. हे कायदेशीर प्रक्रियेनुसार आहे. कलम २६, भारतीय पुरावा अधिनियम

- तुम्हाला केलेल्या गुन्ह्याची कबुली द्यायची असेल तर ती तुम्ही न्यायिक दंडाधिकाऱ्यांनापुढे दिली पाहिजे. एक विशिष्ट प्रक्रिया पाळली गेली पाहिजे. तुम्ही गुन्हा कुठल्याही दबावाखाली कबूल करता कामा नये आणि तुम्हाला ही गोष्ट सांगणे दंडाधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. एकदा तुम्ही कबुली देण्याचा निर्णय घेतला, की तुम्ही जे काही बोलाल ते तुमच्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरता येऊ शकते. दंडाधिकाऱ्यांना असे वाटले, की तुम्ही इच्छा नसताना कबुली देत आहात तर संबंधित दंडाधिकारी तुमचा कबुलीजबाबाब नोंदवून घेणार नाहीत. कलम १६४, सीआरपीसी

**लक्षात घ्या –**

महिला आरोपींची चौकशी केवळ महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच झाली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल शीला बारसे वि. महाराष्ट्र राज्य

### पोलीस कोठडीतील हिंसा हा गुन्हा आहे

चौकशी किंवा प्रश्नोत्तरांदरम्यान कुणावरही छळ, थोबाडीत मारणे, शिवीगाळ किंवा वाईट वागणूक अशी कृती केली जाऊ शकत नाही. पोलिसांनी चौकशीदरम्यान तुम्हाला मारहाण किंवा दुखापत केली तर त्यांना कायद्यानुसार शिक्षा होऊ शकते.पोलीस कोठडीतील बलात्कार हा कायद्यानुसार शिक्षापात्र गुन्हा आहे.

तुम्ही एखाद्या प्रकरणाचे साक्षीदार असाल किंवा एखाद्या प्रकरणातील तथ्ये तुम्हाला माहीत असतील तर पोलीस तुम्हाला त्याबाबत विचारू शकतात, तुमची पडताळणी करू शकतात. खरे पाहता,साक्षीदार म्हणून जबाब नोंदवणे हे तुमचे कायदेशीर कर्तव्य आहे.

### चौकशीदरम्यान साक्षीदाराला खालील अधिकार असतात

- पोलीस अधिकारी साक्षीदाराला केवळ लिखित आदेशाच्या माध्यमातूनच चौकशीसाठी बोलावू शकतात. कलम १६० (१), सीआरपीसी

- कायदा सांगतो, महिला, १५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुलं किंवा ६५ वर्षांहून जास्त वयाची कुणीही व्यक्ती किंवा मानसिक अथवा शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेली कुणीही व्यक्ती यांच्यापैकी कुणालाही चौकशीसाठी पोलीस स्टेशनला बोलवले जाऊ शकत नाही. या व्यक्तींची चौकशी केवळ त्यांच्या राहत्या घरी त्यांच्या कुटुंबीयांसमोरच केली जाऊ शकते. कलम १६०, सीआरपीसी

- तुम्हाला चौकशीसाठी बोलावल्यास पोलिसांना सहकार्य करणं तुमच्यावर बंधनकारक असते. पोलिसांनी विचारलेल्या प्रश्नांची खरी उत्तरेही तुम्हाला द्यावी लागतात. मात्र लक्षात ठेवा, जो प्रश्न तुमच्यावर गुन्ह्याचा दोषारोप लावू शकतो अशा कुठल्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास तुम्ही नकार देऊ शकता. कलम १६१ (२), सीआरपीसी

- साक्षीदाराचा जबाब लगेचच लिखित रूपात नोंदवला गेला पाहिजे. कलम १६१ (३) सीआरपीसी जोवर शक्य असेल तोवर हा साक्षीदाराला समजत असलेल्या भाषेतच त्याचा जबाब नोंदवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.